| | | | |
|---|---|---|---|
| Published Date: | Tuesday 18th August, 2020 | Publication: | Navshakti (Marathi) [Mumbai] |
| Journalist: | Bureau | Page No: | 22 |
| MAV/CCM: | 9,542/11 | Circulation: | 85,100 |


# एईएमएलकडून नवीन वैशिष्ट्यांची स्मार्ट फोनअॅप प्रस्तुती

मुंबई -अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून तिच्या अँड्रॉइड आणि आयओएस अशा दोन्ही व्यासपीठांवर चालणाऱ्या मोबाईल अॅपची नवीन सुधारीत आवृत्तीच्या प्रस्तुतीची घोषणा केली आहे. या नवीन अॅपद्वारे ग्राहकांना त्यांचे मीटर रीडिंग नोंदविणे, देयक भरल्याची पावती मिळविणे या गोष्टींसह  बोटांचे ठसे, चेहरा यांच्यामार्फत अथवा ओटीपीद्वारे लॉगइन, नजीकचे ग्राहकनिगा केंद्र / जीनियस पे किऑस्कची माहिती मिळविणे तसेच महिनागणिक वीज-वापराच्या प्रवाहाला जाणून घेण्यास मदत मिळणार आहे.या अद्ययावत वैशिष्ट्यांव्यतिरिक्त, या अॅपच्या मदतीने देयक भरणा, देयकाची प्रत डाऊनलोड करणे, मीटर रीडिंग तपासणे आणि भरलेल्या देयकांची पूर्वेतिहास, वीजदराची माहिती असे तपशील ग्राहकांना उपलब्ध होतील.